Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

# चारा उत्पादन प्रात्यक्षिके आयोजित करणे

प्रस्तावना

चा-याची उत्पादन प्राप्तक्षिके मोठ्या प्रमाणावर घेणे ही काळाची गरज आहे. पशुजन्य उत्पादनांमध्ये वाढ करण्यासाठी व किफायतशिर उत्पादनासाठी चा-याची पुरेशी उपलब्धता होण्यास अनन्य साधारण महत्व आहे. चारा पिकांची वेगळी लागवड करून चारापीके घेण्याबाबत शेतक-यामध्ये जागृती निर्माण करणे व यामधून चारा पीक लागवडीचे क्षेत्र वाढविणे हा प्रस्तुत उपघटकाअंतर्गत प्रात्यक्षीके घेण्यामागे उद्देश आहे. तसेच चारा उत्पादनाचे अद्यावत तंत्रज्ञान शेतक-यांपर्यत पोहचवणे हा देखील उद्देश आहे. यानुसार प्रकल्प राबविण्यात येणा-या भागांमध्ये २५०० चारा उत्पादन प्रात्यक्षिकांचे प्रकल्प कालावधीत आयोजन करण्यात येणार यावे. ही प्रात्यक्षिके आत्मा व पशुसंवर्धन विभाग यांचेव्दारे संयुक्तरित्य आयोजित करावे.

कार्यक्षेत्र

महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत निवडण्यात आलेल्या १८ जिल्हयातील तालुक्यात /गावामध्ये प्रकल्प कालावधीत एकूण २५०० प्रात्याक्षिकांचे आयोजन करावे.

उपघटकाचे स्वरूप

चारा उत्पादन प्रात्यक्षिके आयोजित करणे, या उपघटकाची अंमलबजावणी आत्मा व पशुसंवर्धन खाते संयुक्तरित्या करतील. तालुका पातळीवर पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती व तालुका आत्मा प्रतिनिधी संयुक्त रित्या शेतक-यांची निवड करावी, शेतक-याचे संमतीपत्र व अर्ज जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्यामार्फत जिल्हास्तरीय निवड समितीस सादर करावे. जिल्हास्तरीय निवड समितीने अर्जास मंजूरी दयावी व त्यानंतर शेतक-याची निवड करावी.

प्रात्यक्षिकांतर्गत -जमिनीची पूर्व मशागत, चारा पिकांची व बि बियाणे यांची माहीती, रासायनिक खतांचा वापर, शेंद्रीय खतांचा वापर, जैविक खतांचा वापर व किटकनाशकांचा वापर यांची माहिती तालुका आत्मा प्रतिनिधी यांनी प्रात्यक्षिक धारकांना दयावी . प्रात्यक्षिकांतर्गत एकदल वर्णी पीके - मका, ज्वारी, बाजरी इ., व्दिदल वर्णी चारा पीके-लसूण घास, बरसीम, स्टायलो इ. संकरीत गवत-यशवंत, जयवंत इ., सुधारित चारा पिके - - न्यूट्रीफीड इ. ही चारा पिके घेण्यात यावीत.

अशा प्रकारची चारा पिकांच्या लागवडीबाबतची माहिती प्रात्यक्षिकाच्या अंमलबजावणीपूर्वी देण्यात यावी. तसेच बीयाणे, खते, किटकनाशके यांचा पुरवठा शेतक-यांना १००% अनुदानावर करण्यात यावा. पिकनिहाय बियाणे, सेंद्रिय व रासायनिक खते याबाबतचा अनुज्ञेय खर्च कृषि विद्यापिठाने विहीत केलेल्या प्रमाणकांनुसार करण्यात यावा. लागवडीचे क्षेत्र प्रतिलाभार्थी ०.१० हेक्टर ते ०.४० हेक्टर एवढे मर्यादित राहील. उत्पादीत झालेल्या चा-याच्या नोंदी ठेवण्यात याव्यात.

शेतक-यांची निवड

निवड करावयाच्या शेतकऱ्यांच्या निवडीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

१. चारा उत्पादनासाठी किमान २५ गुंठे इतके बागायती क्षेत्र उपलब्ध असणे आवश्यक राहील.
२. चारा पीक उत्पादन क्षेत्र प्रात्यक्षिकासाठी संमती देणे जरूरी आहे.
३. शेतक-यांकडे दुभती जनावरे, शेती कामांचे बैल असणे आवश्यक आहे.
४. दुधसंस्थेचा सदस्य अथवा पशुसंवर्धन बचत गटांच्या सहभागास प्राधान्य देण्यात यावे.
५. मशागत पत्र उपलब्ध करून देणे व अनुभवकथन या करिता लेखी स्वरूपात देण्याची संमत्ती देणे जरूरी आहे.
६. अन्य शेतकऱ्यांना प्रक्षेत्रावर भेट देण्यास कोणतीही हरकत नसल्याचे संमतीपत्र देणे आवश्यक राहील. शेतकरी / पशुपालकांची निवड जिल्हास्तरीय समितीद्वारे करण्यात यावी.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

अंदाजपत्रक

या उपघटकाच्या अंमलबजावणीसाठी निधी संबधित जिल्हयाच्या आत्मा यंत्रणेमार्फ त धनाकर्षाव्दारे /धनादेशाव्दारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे उपलब्ध होणार आहे. सदर प्रात्यक्षीक राबविण्यासाठी प्रति वैरण प्रात्यक्षिक प्लॉट / भूखंड रूपये ७०००/-ची तरतूद करण्यात आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

बीयाणे, खते, रासायनिक खते/सेंद्रिय खते/ जिवाणू खते, किटकनाशके - रू.५५००/-

प्रात्यक्षिकाचे आयोजन प्रसिध्दी व प्रचार - रू.१५००/-

एकुण - रू. ७०००/-

बीयाणे, खते, रासायनिक खते/सेंद्रिय खते/ जिवाणू खते, किटकनाशके यांची खरेदी जागतिक बॅकेच्या विहित संपादन पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी. तसेच यासाठी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त/सक्षम अधिकारी यांची तांत्रिक मंजूरी करण्यात यावी. उत्पादनाच्या नोंदी अद्यावत ठेवण्यात याव्यात.

प्रकल्प राबविण्यात येत असलेल्या १८ जिल्ह्यांत आयोजित करावयाच्या प्रात्यक्षिकांबाबतचे भौतिक लक्ष्य सोबतच्या विवरणपत्रानुसार राहील.अशा रितीने प्रकल्प कालावधीत एकूण २५०० प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात यावे.

संनियत्रण

जिल्हा पातळीवर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त योजनेचे संनियंत्रण करावे. तालुका पातळीवर पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती व आत्मा प्रतिनिधी प्रात्यक्षिकांच्या आयोजनाची कार्यवाही संयुक्तरित्या करावी.

फलनिष्पती

शेतक-यांमध्ये चारा उत्पादन तंत्रज्ञान वाढीस लागण्यास मदत होईल. शेतक-यांना विश्वसनीय व पौष्टीक चारा जनावरास उपलब्ध होईल त्यामुळे त्यांचेकडील जनावरांच्या दुग्धोत्पादनात वाढ होईल. तसेच जनावरांचे स्वास्थ सुदृढ होण्यास मदत होईल. चारा उत्पादन हे उदर निर्वाहाचे साधन ठरण्यास मदत होईल.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## चारा उत्पादनाची प्रात्यक्षिके, प्रात्यक्षिकांची जिल्हावार भौतिक उद्दिष्ट

| अ. क्र. | मोठया जनावरांचे बाजार (गाय + म्हैस) | | एकुण भौतिक उद्दिष्ट | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाजाराचे नाव | जिल्हा | | | | | | |
| १ | चांदुर बाजार | अमरावती | १०४ | ३० | २४ | २० | २० | १० |
| २ | करंजा | वाशिम | १०४ | ३० | २४ | २० | २० | १० |
| ३ | पुसद | यवतमाळ | १०४ | ३० | २४ | २० | २० | १० |
| ४ | मेहकर | बुलढाणा | १०४ | ३० | २४ | २० | २० | १० |
| ५ | नेवासा | अहमदनगर | १०४ | ३० | २४ | २० | २० | १० |
| ६ | कर्जत (शेळी मेंढी बाजार) | अहमदनगर | १०४ | ३० | २४ | २० | २० | १० |
| | टप्पा १ एकूण | | ६२४ | १८० | १४४ | १२० | १२० | ६० |
| ७ | सावनेर | नागपुर | १०४ | ० | २४ | ३० | २५ | २५ |
| ८ | लाखनी | भंडारा | १०४ | ० | २४ | ३० | २५ | २५ |
| ९ | आमगाव | गोंदिया | १०५ | ० | २५ | ३० | २५ | २५ |
| १० | कडा | बीड | १०५ | ० | २५ | ३० | २५ | २५ |
| ११ | सांगोला | सोलापुर | १०४ | ० | २४ | ३० | २५ | २५ |
| १२ | अकलुज | सोलापुर | १०४ | ० | २४ | ३० | २५ | २५ |
| | टप्पा २ एकूण | | ६२६ | ० | १४६ | १८० | १५० | १५० |
| १३ | पिंपळगाव बसवंत | नाशिक | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| १४ | पाचोरा | जळगाव | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| १५ | अंमळनेर | जळगाव | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| १६ | शिरपुर | धुळे | १०५ | ० | ० | ० | ५२ | ५३ |
| १७ | वसई | ठाणे | १०५ | ० | ० | ० | ५२ | ५३ |
| १८ | खेड | पुणे | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| १९ | लोणंद | सातारा | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| २० | सांगली | सांगली | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| २१ | वडगाव पेठ | कोल्हापुर | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| २२ | आटपाडी (शेळी मेंढी बाजार) | सांगली | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| २३ | दौंड (शेळी मेंढी बाजार) | पुणे | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| २४ | दहीवडी (शेळी मेंढी बाजार) | सातारा | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| | टप्पा ३ एकूण | | १२५० | ० | ० | ० | ६२४ | ६२६ |
| | एकुण | | २५०० | १८० | २९० | ३०० | ८९४ | ८३६ |